क्रमांक : का.स./बैठक/२०७

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ३ जून, २००४.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ मे, २००४ (मंगळवार) रोजी झालेल्या २०७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

०३.६.२००४

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति :

मुख्य सचिव, - अध्यक्ष
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर, - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे, - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन्, - सदस्य
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

प्रधान सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (पर्यावरण),
उर्जा व पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेपित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या २०७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १८ मे, २००४ (मंगळवार) |
| वेळ | : | दुपारी ३.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका. | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको. | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.विश्वास धुमाळ
प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन

डॉ.टी. चंद्र शेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक

श्री.जी.एन.वराडे
संचालक, पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन
(सचिव, उर्जा व पर्यावरण विभाग यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग व
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या (१) दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०५ व्या, (२) दिनांक १६ फेबुवारी, २००४ रोजी झालेल्या विशेष (गोपनीय) व (३) दिनांक २० फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०६ व्या बैठकींचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ बैठकींचे कार्यवृत्त पक्के करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, २०५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तातील बाव क्र.१८ संबंधीचा ठराव तसेच २०६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तातील बाब

क्र.१ संबंधीचा ठराव या दोन्ही ठरावांस ९०३ असा क्रमांक दिला आहे. नजरचुकीने टंकलेखनाची चूक झाली आहे. म्हणून २०६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तातील बाब क्र.१ संबंधीच्या ठरावास ९०३ ऐवजी ९०४ असा क्रमांक देण्यात यावा व त्यामुळे २०६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तातील पुढील बाब क्र.२ संबंधीच्या ठरावास ९०४ ऐवजी ९०५ असा क्रमांक देण्यात यावा.

१.२ वरील दुरुस्तीसह कार्यवृत्ते कायम करण्यात आली.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या (१) दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०५ व्या, (२) दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या विशेष व (३) दिनांक २० फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०६ व्या बैठकींच्या कार्यवृत्तांवरील कार्यवाही अहवाल.**

२.१ दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालातील खालील दोन बाब टिप्पणींवर पुढीलप्रमाणे चर्चा झाली :-

बाब क्र.४ : अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद प्रवास यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्ताव.

यासंबंधात महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या शिफारशीनुसार विविध बाबींच्या मान्यतेसाठी प्राधिकरणास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा (BOOT) या तत्वावर करावयाची असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडून कमीतकमी मदतीची अपेक्षा करणा-या कंत्राटदारास प्राधान्य देण्यात येईल. अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, प्रकल्पाच्या कामासाठी जून, २००४ मध्ये निविदा सूचना प्रकाशित करण्यात येईल व डिसेंबर, २००४ पर्यंत कंत्राटदाराची नेमणूक करण्यात येईल. तसेच डिसेंबर, २००६ पर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी यापुढे असेही सांगितले की, या प्रकल्पासाठी प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती करण्यासंबंधात शासनाने आदेश काढणे आवश्यक आहे. यासंबंधात मा.अध्यक्षांनी सूचना

केली की, प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधीन राहून यासंबंधीचा प्रस्ताव नगर विकास विभागास सादर करावा.

बाब क्र.१३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या मजबूतीकरणाच्या (भाग-II) कंत्राटास मान्यता देणेबाबत.

अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, या योजनेच्या कामास सुरुवात झाली आहे. तथापि, या योजनेंतर्गत बांधावयाच्या रेल्वे वरपूलासाठी रेल्वेने पर्यवेक्षणाची फी म्हणून रु.४.५ कोटी इतक्या रक्कमेची मागणी केली आहे. रेल्वेची ही मागणी संयुक्तिक नाही. म्हणून या विषयासंबंधात निर्णय घेण्यासाठी नगर विकास विभागाने सर्व संबंधितांची बैठक लवकरात लवकर आयोजित करणे आवश्यक आहे.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

## बाब क्र.३ : जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचा सविस्तर अभियांत्रिकी अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या देयकास मंजूरी मिळणेबाबत.

३.१ प्रस्तावाबाबत माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामध्ये जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करण्याचा प्रस्ताव अंतर्भूत आहे. या रस्त्याचे ३+३ पदरी रुंदीकरण करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मे. विल्बर स्मिथ अँड असोसिएट्स व मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस या सल्लागारांना दिले होते. त्यानुसार त्यांनी कामाचे सविस्तर प्रस्ताव तयार करुन सन १९९८ मध्ये प्राधिकरणास सादर केले होते. त्यासाठी त्यांना रु.३४१.३१ लाख इतकी फी अदा केली आहे. जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. सल्लागारांनी यापूर्वी तयार केलेल्या संकल्पचित्रांचे पुनर्विलोकन केले असता एमएसआरडीसी यांना दस्ताऐवजांमध्ये व संकल्पचित्रामध्ये बदल करण्याची आवश्यकता वाटली. पूर्वीच्या सल्लागारांपैकी मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस

यांना या कामाबद्दल माहिती असल्यामुळे प्रकल्पाचा तांत्रिक प्रस्ताव व संकल्पना, Scope यामध्ये बदल करण्याचे काम एमएसआरडीसीने मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांना दिले. या सल्लागारांनी प्रकल्पाचा सविस्तर अभियांत्रिकी अहवाल तयार केला असून सदर अहवालास जागतिक बँकेने मान्यता दिली आहे व या प्रकल्पाचे काम सुरु झाले आहे.

३.२ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी यापुढे असे सांगितले की, मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांना जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचा सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी रु.२६.८० लाख इतकी फी (सेवाकरासह) अदा करावयाची आहे. सदर प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभाग राबवित असल्यामुळे हा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाचा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या खर्चास मंजूरी देण्याची शिफारस शासनाकडे केली आहे. त्यानंतर, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काहीही प्रतिसाद मिळालेला नाही. सदर प्रकल्प मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत येत असल्यामुळे हा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून प्रतिभाग निधी (Counterpart Fund) म्हणून करावा लागेल व नंतर हा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वसूल करावा लागेल. या खर्चाच्या वसूलीसाठी प्राधिकरणाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करावा असे प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी सूचविले.

३.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९०६</u> :

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मे. कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस (इंडिया) लि. यांनी जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी केलेल्या कामाच्या अतिरिक्त देयकाच्या रु.२६.८० लाखाच्या (सेवाकरासह) मागणीस कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे.”

**बाब क्र.४ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्याकरीता अतिरिक्त खर्चास कार्योत्तर मंजूरी देणे.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्याकरीता, कार्यकारी समितीच्या मान्यतेने, मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस या सल्लागारांची नेमणूक करण्यात आली होती. या सल्लागारांनी तयार केलेल्या प्राथमिक अहवालावर फेब्रुवारी, २००१ मध्ये अभ्यास पुनर्विलोकन समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानंतर, मा.श्री.नबाब मलिक, राज्यमंत्री यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत असे ठरविण्यात आले की, लाल बहादूर शास्त्री मार्ग ते मिठी नदीपर्यंत प्रकल्पाच्या व्याप्तीचा विस्तार करण्यात यावा. तसेच कुर्ला येथील रेल्वे वरपूलापासून लोकमान्य टिळक टर्मिनस व कुर्ला (पूर्व) येथील एस.जी.बर्वे मार्गास जोडणा-या रस्त्याचाही प्रकल्पामध्ये समावेश करावा असे ठरविण्यात आले. त्यानुसार सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्र व आराखडे तयार करण्याचे काम सल्लागारांनी हाती घेतले. त्यानंतर, मध्य रेल्वेने सुचविल्याप्रमाणे सामान्य रचना संकल्पचित्रे (GAD) व आराखडे यामध्ये बदल करुन सुधारीत संकल्पचित्र व आराखडे तयार करावे लागले. मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांनी केलेल्या अतिरिक्त कामासाठी त्यांना रु.३६.३६ लाख इतकी रक्कम (सेवाकरासह) अदा करणे आवश्यक आहे.

४.२ त्यांनतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

ठराव क्र.९०७ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) लि. यांनी सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास व सविस्तर अभियांत्रिकी

संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्यासाठी केलेल्या अतिरिक्त देयकाच्या रु.३६.३६ लाखाच्या (सेवाकरासह) मागणीस कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे."

**बाब क्र.५ : उड्डाणपूलाखालील जागेचा वाणिज्यिक वापर.**

५.१ या बाब टिप्पणी संबंधात माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम ६८ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार काही अटींच्या अधीन राहून वरपूलाच्या आणि उड्डाणपूलाच्या खालील जागेचा वाणिज्यिक वापर करता येतो. विकास नियंत्रण नियमावलीतील अटींनुसार उड्डाणपूलाची योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभागाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. उड्डाणपूल बांधण्याच्या प्रस्तावांचे महत्व लक्षात घेऊन प्राधिकरणाने सल्लागारांमार्फत उड्डाणपूलाखालील जागेच्या वाणिज्यिक वापरासंबंधी अभ्यास पूर्ण केला आहे. कार्यकारी समितीच्या २०४ व्या बैठकीमध्ये सल्लागारांच्या शिफारशी विचारार्थ सादर केल्या होत्या. कार्यकारी समितीच्या निदेशानुसार कोणत्या प्रकारच्या वाणिज्यिक विकासाच्या कामांना परवानगी देता येईल तसेच कोणत्या प्रकारच्या मुलभूत सुविधा उड्डाणपूलाखालील जागेत विकसित करता येतील याची यादी व मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), बृहन्मुंबई महानगरपालिका आणि वाहतूक पोलीस खाते यांच्याकडून लेखी अभिप्राय मिळविण्यात आले आहेत. त्यानंतर यासंबंधात प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी कार्यकारी समितीसमोर सादरीकरण केले.

५.२ अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अभिप्रायानुसार उड्डाणपूलाखालील जागेचा वाणिज्यिक वापर तातडीने हाती घेणे आवश्यक नाही, मात्र हा पर्याय खुला ठेवण्यात यावा. बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार उड्डाणपूलाखालील जागेचा वाणिज्यिक वापर करावयाचा झाल्यास पादचा-यांना मुख्य रस्ता ओलांडण्यास बंदी घालणे आवश्यक आहे. त्यासाठी पादचा-यांसाठी पादचारी पूल किंवा भूयारी मार्ग उपलब्ध करुन द्यावे लागतील. तथापि, आतापर्यंतच्या अनुभवानुसार, पादचारीपूल व भूयारी मार्गाचा वापर पादचा-यांकडून खूपच कमी प्रमाणात होतो व बरेचसे पादचारी मुख्य रस्ता

ओलांडताना दिसतात. म्हणून उड्डाणपूलाखालील जागेत कोणत्याही वाणिज्यिक विकासांच्या कामांना परवानगी देणे योग्य होणार नाही. त्याऐवजी फक्त पार्किंगसाठी आणि सुशोभिकरणासाठी परवानगी देण्यात यावी. तसेच मुंबईतील उड्डाणपूल अतिशय गचाळ दिसतात. म्हणून या उड्डाणपूलांचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अनेक रस्त्यांची कामे हाती घ्यावयाची असल्यामुळे उड्डाणपूलाखालील जागेच्या वाणिज्यिक वापरासंबंधी तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे.

५.३ त्यानंतर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, उड्डाणपूलाखालील जागेच्या वाणिज्यिक वापरातून फारसे उत्पन्न मिळणार नाही. तसेच सध्याच्या उड्डाणपूलांचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. म्हणून उड्डाणपूलाखालील जागेचा वापर फक्त पार्किंग व सुशोभिकरणासाठी करण्यात यावा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनीही असे मत प्रदर्शित केले की, उड्डाणपूलाखालील जागेकडे प्राप्तीचे साधन (Source of Income) म्हणून पहाण्यात येऊ नये.

५.४ यासंबंधात चर्चा केल्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, उड्डाणपूलाखालील जागेच्या वापरासाठी पार्किंग व सुशोभिकरणाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. सुशोभिकरणाचे काम जाहिरात कंपन्यांद्वारे करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत व यासंबंधात प्राधिकरणाने व एमएसआरडीसीने पुढाकार घ्यावा. तसेच वाणिज्यिक वापरासंबंधीच्या निवडक प्रस्तावांवर प्रकरणनिहाय व गुणवत्तेच्या आधारे निर्णय घ्यावेत, मात्र वाणिज्यिक वापरामुळे वाहतूकीस अडथळा होणार नाही यासंबंधी दक्षता घेण्यात यावी.

## बाब क्र.६ : वरपूलाच्या संकल्पनाची प्रूफ तपासणीकरीता सल्लागाराची नेमणूक करणे.

६.१ या संदर्भात प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अभ्यासांतर्गत बिगर रेल्वे घटकाखाली ३ रेल्वे वरपूलांकरीता संकल्पचित्रे व देकारांचे दस्तऐवज तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. ३ वरपूलांपैकी विक्रोळी येथील वरपूलाच्या General Arrangement Drawing (GAD) ला मध्य रेल्वेने मान्यता दिली आहे.

उर्वरीत २ वरपूलांच्या GAD ला लवकरच मान्यता मिळेल अशी अपेक्षा आहे. वरपूलाच्या रेल्वेभागातील स्ट्रक्चरल संकल्पचित्राच्या प्रूफ तपासणीकरीता प्रूफ कन्सल्टंटची नेमणूक करणे आवश्यक असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्राधिकरणाने कळविले होते की, महानगरपालिकेने स्वतःच्या खर्चातून प्रूफ कन्सल्टंटची नेमणूक करावी. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागारांची यादी तयार केली. तथापि, महानगरपालिकेने सुचविलेल्या यादीतील सल्लागारांना रेल्वेच्या कामाचा पुरेसा अनुभव नसल्यामुळे या यादीव्यतिरिक्त दुसरे सल्लागार नेमावे अशी सूचना मध्य रेल्वेने केली. त्यानंतर महानगरपालिकेने असे कळविले की, रेल्वेने सुचविलेले सल्लागार महानगरपालिकेच्या मान्यताप्राप्त यादीत नसल्यामुळे त्यांच्या नेमणूकीस फारच विलंब लागेल. त्यानंतर, महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या रेल्वेचे अधिकारी तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका व प्राधिकरणाचे अधिकारी यांच्या बैठकीत ठरविण्यात आले की, वेळेची बचत करण्यासाठी प्राधिकरणाने मे. शिरीष पटेल आणि असोसिएट्स यांची विक्रोळी येथील वरपूलासाठी प्रूफ कन्सल्टंट म्हणून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या जास्तीत जास्त ०.५% इतक्या रक्कमेच्या फी वर नेमणूक करावी व सदर फी वरील खर्च प्रकल्प अंमलबजावणी करणा-या संस्थेकडून वसूल करण्यात यावा. मध्य रेल्वेने मे. शिरीष पटेल आणि असोसिएट्स यांना पसंती दिली आहे. विक्रोळी येथील वरपूलाचे बांधकाम याचवर्षी हाती घ्यावयाचे असल्यामुळे प्रूफ कन्सल्टंटची नेमणूक लवकर करणे आवश्यक आहे. प्रूफ कन्सल्टंटच्या नेमणूकीवरील खर्च प्रथम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण करेल व नंतर तो खर्च बृहन्मुंबई महानगरपालिकेला जागतिक बँकेकडून मिळणा-या कर्जातून वळता करुन घेण्यात येईल.

६.२ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९०८</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) आणि उपकलम (५) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे. शिरीष पटेल आणि असोसिएटस् यांची विक्रोळी येथील वरपूलाच्या

स्ट्रक्चरल संकल्पचित्राच्या तपासणीकरीता प्रूफ कन्सल्टंट म्हणून या प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या जास्तीत जास्त ०.५% (जास्तीत जास्त सुमारे रुपये १४ लाख) इतक्या फी वर सोल सोर्स बेसीसवर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागारांच्या फी साठी आवश्यक तो खर्च प्रथम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करण्यास आणि नंतर तो खर्च बृहन्मुंबई महानगरपालिकेला मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून मिळणा-या कर्जातून वळता करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्रूफ कन्सल्टंटच्या नेमणूकीसंबंधी पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्ते विकास कामाच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीकडून मंजूरीत एकूण २५ निविदांपैकी दोन कामांच्या सुधारीत अंदाजित रकमेची मंजूरी देणेबाबत.**

७.१ या बाब टिप्पणीची पार्श्वभूमी विशद करताना मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाच्या एकूण ३८ रस्ते विकास कामांच्या निविदांपैकी २५ कामांना कार्यकारी समितीच्या २०६ व्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली होती. तसेच उर्वरीत १३ निविदाकारांसमवेत वाटाघाटी करुन त्यांच्या देकारातील दर कमी करण्यास ते तयार आहेत किंवा कसे याची पडताळणी करावी व तसे करण्यास ते तयार असल्यास त्यांचे देकार स्विकृत करावेत, अन्यथा सर्व देकार रद्द करुन फेर निविदा मागवाव्यात असे कार्यकारी समितीने निदेश दिले. त्याप्रमाणे वाटाघाटी केल्या असता दोन निविदाकारांनी प्रथम लघुत्तम देकाराप्रमाणे कामे करण्याची तयारी दर्शविल्याने त्यांच्या निविदा मान्य करण्यात आल्या व उर्वरीत कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत. तथापि, यासंबंधात कार्यकारी समितीच्या २०६ व्या बैठकीत सादर केलेल्या बाब टिप्पणीत असे नमूद केले होते की, लाल बहादूर शास्त्री मार्गावरील कामांच्या मेसर्स अशोका बिल्डकॉन यांच्या

२ निविदांतील दर हे मूळ अंदाजित किंमती इतके आहेत. त्यानंतर या निविदांची छाननी करताना असे आढळून आले की, हे देकार मूळ अंदाजित किंमती इतके नसून ते सुधारीत किंमती इतके आहेत. म्हणून आता सादर केलेल्या बाब टिप्पणीनुसार ही त्रुटी सुधारीत करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

७.२ वरील पार्श्वभूमी विचारात घेऊन कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन या संदर्भातील पुढील कार्यवाही त्वरीत हाती घेण्याचे आदेश दिले व पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९०९</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (तीन) आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे कार्यकारी समितीच्या २०६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तातील बाब क्र.२ संबंधित ठरावाच्या <u>जोडपत्र-१</u> मधील अनुक्रमांक १६ व १७ मधील कामांच्या सुधारीत अंदाजित रक्कमा तसेच या कामासंबंधात मे.अशोका बिल्डकॉन लि. यांच्या निविदांच्या रक्कमांमध्ये प्रस्तावित सुधारणा मान्य करुन या दोन कामांसाठी पुढीलप्रमाणे सुधारीत रक्कमांस मंजूरी देत आहे :-

| निविदेतील कामाचे क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये | निविदाकाराचे नांव | निविदेची रक्कम (रु.) | टक्केवारी | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १६. | लालबहादुर शास्त्री मार्ग, सायन ते कांजूर मार्ग (०.०० ते ११.१५६ कि.मी.) | ३४,९८,२७,९१२.०० | मेसर्स अशोका बिल्डकॉन लि. | ३२,२७,१६,२४८.८२ | (-)७.७५% | लघुत्तम |
| १७. | लालबहादुर शास्त्री मार्ग, कांजूर मार्ग ते मुलुंड चेकनाका (११.१५६ ते १८.८३१ कि.मी.) | २५,०९,०४,७७१.०० | मेसर्स अशोका बिल्डकॉन | २२,५९,३९,७४६.२८ | (-)९.९५% | लघुत्तम |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गतच्या रस्ते विकास कामांच्या ११ फेरनिविदांना मंजूरी देणेबाबत.**

८.१ या प्रस्तावाची पार्श्वभूमी विशद करताना मुख्य अभियंता यांनी सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या ३८ निविदांपैकी २५ निविदांना कार्यकारी समितीच्या २०६ व्या बैठकीत मंजूरी देण्यात आली होती. तसेच कार्यकारी समितीने असे निदेश दिले होते की, उर्वरीत १३ निविदाकारांसमवेत वाटाघाटी करुन त्यांच्या देकारातील दर कमी करण्यास ते तयार आहेत किंवा कसे याची पडताळणी करावी व तसे करण्यास ते तयार असल्यास त्यांचे देकार स्विकृत करावेत, अन्यथा सर्व देकार रद्द करुन फेर निविदा मागवाव्यात. त्याप्रमाणे वाटाघाटी केल्या असता दोन निविदाकारांनी प्रथम लघुत्तम देकाराप्रमाणे कामे करण्याची तयारी दर्शविल्याने त्यांच्या निविदा मान्य करण्यात आल्या व उर्वरीत कामासाठी फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार रु.२६३.२४ कोटी खर्चाच्या या ११ कामांच्या निविदा सूचना दिनांक २९ फेब्रुवारी, २००४ रोजी टाईम्स ऑफ इंडिया, लोकसत्ता आदि वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा कालावधी ४५ दिवस ठेवण्यात आला व प्राप्त निविदा दिनांक २१ एप्रिल, २००४ रोजी उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांची प्राधिकरणाच्या अधिका-यांमार्फत छाननी करण्यात आली व त्याप्रमाणे ११ पैकी क्रमांक २ व ६ ची कामे वगळून अंदाजपत्रकीय दराच्या तुलनेत कमी दराच्या असलेल्या ९ कामांच्या निविदांची कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. मुख्य अभियंता यांनी असेही सांगितले की, क्रमांक २ व ६ च्या २ निविदा चढया दराच्या असल्यामुळे त्याबाबत पुढील कार्यवाही काय करावी याबाबत कार्यकारी समितीने मार्गदर्शन करावे.

८.२ या प्रस्तावावर सविस्तर चर्चेनंतर, कार्यकारी समितीने क्रमांक २ व ६ वगळता उर्वरीत ९ कामांच्या लघुत्तम निविदांना मंजूरी दिली. तसेच क्रमांक ६ चे काम म्हणजे जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावरील सेवा रस्ते बांधण्याच्या निविदेसंदर्भात संबंधित कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन दर

कमी करण्याचा प्रयत्न करावा, अन्यथा फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे कार्यकारी समितीने निदेश दिले. तसेच क्रमांक २ चे काम म्हणजे स्वामी विवेकानंद रस्त्याच्या गोरेगांव-मुलूंड रस्ता चौक ते सांताक्रुझ येथील मिलन सब-वे पर्यंतच्या भागाच्या कामाच्या संदर्भात कार्यकारी समितीने असे निदेश दिले की, मे.पेट्रॉन प्रतिभा (जे.व्ही.) यांच्या निविदेच्या अपात्रतेची कारणे पुन्हा एकदा तपासून पहावीत कारण मे.पेट्रॉन प्रतिभा या कंपनीची वेळेवर व चांगली कामे करण्याची ख्याती आहे तसेच किरकोळ त्रुटींसाठी त्यांना अपात्र ठरविणे उचित होणार नाही. त्याकरिता पुन्हा त्यांच्या निविदेची योग्य ती पडताळणी करावी व तद्नंतर वाटाघाटीने त्यांचे दर कमी करण्याचाही प्रयत्न करावा व दर कमी करण्यास निविदाकार तयार झाल्यास महानगर आयुक्तांनी या निविदेस मंजूरी द्यावी.

८.३ वरील बाबी विचारात घेऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९१०</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (तीन) आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधांतर्गत हाती घ्यावयाच्या कामांच्या खर्चास सोबत जोडलेल्या <u>जोडपत्र-१</u> मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुमारे रु.२००.६१ कोटी खर्चाच्या एकूण ९ निविदा स्विकारण्यास, करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह, मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.९</u> : <u>श्री.एस.पी.पेंढारकर, प्रमुख, नियोजन विभाग यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्याबाबत (गोपनीय).</u>**

९.१ या प्रस्तावाबावत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, श्री.एस.पी.पेंढारकर, प्रमुख, नियोजन विभाग हे प्राधिकरणाच्या सेवेतून दिनांक ३१ मे, २००४ रोजी नियत वयोमानानुसार

निवृत्त होत आहेत. हे पद भरण्यासाठी प्राधिकरणाने दिलेल्या जाहिरातीनुसार २५ उमेदवारांचे अर्ज प्राधिकरणास प्राप्त झाले असून या अर्जांची छानणी करण्याचे काम सुरु आहे. श्री.वि.कृ.फाटक, प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे सुध्दा प्राधिकरणाच्या सेवेतून दिनांक २९ फेब्रुवारी, २००४ रोजी निवृत्त झाले आहेत व हे पद भरण्यासाठी उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १७ मे, २००४ रोजी घेण्यात आल्या आहेत. प्रमुख, नियोजन विभाग हे पद भरण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. तसेच श्री.फाटक यांच्या सेवानिवृत्तीनंतर प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.पेंढारकर यांना देण्यात आला आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, श्री.पेंढारकर दिनांक ३१ मे, २००४ रोजी प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त होत असले तरीही त्यांच्या सेवेची प्राधिकरणास आवश्यकता आहे. म्हणून सेवानिवृत्तीनंतर श्री.पेंढारकर यांची दिनांक १ जून, २००४ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २००४ अशा पुढील ३ महिन्यांच्या कालावधीसाठी **"विशेष कार्यकारी अधिकारी"** म्हणून कंत्राटी पध्दतीने प्राधिकरणात नियुक्ती करण्यात यावी असा प्रस्ताव आहे.

९.२ या प्रस्तावावर चर्चा होताना प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, मुंबई अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड संबंधीचे काम प्रगतीपथावर आहे. या कामासाठी श्री.पेंढारकर यांची आवश्यकता आहे. म्हणून श्री.पेंढारकर यांची कंत्राट पध्दतीने ३ ऐवजी ६ महिन्यांसाठी नियुक्ती करावी. या सूचनेस मा.अध्यक्षांनी मान्यता दिली.

९.३ वरील चर्चेनुसार, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९११ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (एक) आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे श्री.एस.पी.पेंढारकर यांना ते प्रमुख, नियोजन विभाग या पदावरुन निवृत्त झाल्यानंतर पुढील सहा महिन्यांकरीता (दिनांक १ जून, २००४ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २००४) **"विशेष कार्यकारी अधिकारी"** म्हणून कंत्राटीपध्दतीने नियुक्त करण्यास मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** श्री.पेंढारकर यांना सध्या देण्यात येणा-या सर्व सुविधा म्हणजे निवास ते कार्यालय व परत या प्रवासासाठी कार्यालयीन वाहन, पेपर बीलाची प्रतिपूर्ती, मोबाईल फोन, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इत्यादी, यापुढेही त्यांच्या कंत्राट कालावधीमध्ये देण्यास कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे. सदर काळामध्ये श्री.पेंढारकर यांना चार दिवसांची किरकोळ रजा देण्यात येईल. तथापि, त्यांना भविष्य निर्वाह निधी अंशदान व इतर कोणत्याही वित्तीय सवलती देय रहाणार नाहीत."

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करण्याबाबत (गोपनीय).**

१०.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, श्री.वि.कृ.फाटक, प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे नियत वयोमानानुसार प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झाल्यामुळे प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे पद दिनांक १ मार्च, २००४ पासून रिक्त आहे. हे पद भरण्यासाठी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार ११ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग तसेच प्रमुख, नियोजन विभाग या पदांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी व उमेदवारांची निवड करण्याकरीता एक समिती नियुक्त केली आहे. प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करतेवेळी या समितीस असे दिसून आले की, प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग; प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग तसेच प्रमुख, नियोजन विभाग या पदांची वेतनश्रेणी समान असूनसुध्दा सेवाप्रवेश नियमातील आवश्यक असलेल्या अनुभवाचा कालावधी भिन्न आहे. म्हणून प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील १० वर्षाच्या अनुभवाची अट शिथिल करुन ७ वर्षाचा अनुभव असावा असा बदल करण्यास या समितीने सुचविले आहे. तसेच ज्याप्रमाणे प्राधिकरणातील कर्मचा-यांना वयाची अट लागू नाही त्याप्रमाणे शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रम / स्वायत्त महामंडळे यामधील कर्मचा-यांनाही वयाची अट लागू करु नये असे समितीने सुचविले आहे. समितीच्या सूचनेप्रमाणे दिनांक १७ मे, २००४ रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या

जाहिरातीस मिळालेला अत्यल्प प्रतिसाद लक्षात घेऊन समितीने सुचविल्याप्रमाणे सेवाप्रवेश नियमात बदल करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

**१०.२** सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने प्रस्तावास मंजूरी दिली. त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९१२</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदाच्या, बाब टिप्पणीत प्रस्ताविल्यानुसार, खालील सुधारीत सेवाप्रवेश नियमास कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे :-

<u>आवश्यक अर्हता</u> :

(१) वास्तुशास्त्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी आणि

(२) नगर रचना किंवा नगर आणि प्रादेशिक नियोजन किंवा नगर संकल्पन या विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठ / संस्थेची पदव्युत्तर पदवी / पदविका.

<u>प्राधान्य</u> : इन्स्टिटयूट ऑफ टाऊन प्लॅनर्स (इंडिया) किंवा तत्सम मान्यताप्राप्त संस्थांचे व्यावसायिक सदस्यत्व.

<u>अनुभव</u> : पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षाचा नगर रचना क्षेत्रात काम केल्याचा अनुभव आवश्यक. त्यापैकी किमान ७ वर्षे वरिष्ठ नियोजक किंवा उप संचालक, नगर रचना किंवा तत्सम पदावर काम केलेले असावे.

<u>वय</u> : ५० वर्षाहून अधिक नसावे. प्राधिकरणातील / शासकीय / निमशासकीय / स्वायत्त महामंडळे / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यामध्ये सेवेत असलेल्या उमेदवारांना वयाची अट लागू नाही.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी व पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : सिकॉमकडील प्राधिकरणाची ठेव रु.१३४ कोटी याबाबतचा अहवाल.**

**११.१** मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाची सिकॉमकडे रु.२४६.१६ कोटीची ठेव होती, त्यापैकी सिकॉमने रु.११२.१६ कोटीइतकी रक्कम परत केलेली आहे. आजमितीस सिकॉमकडे रु.१३४ कोटी इतकी रक्कम ठेवींच्या स्वरुपात आहे. प्राधिकरणाने सिकॉमकडे ३ वर्षासाठी ठेवी ठेवाव्यात, अशी विनंती सिकॉमने प्राधिकरणास केलेली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, सदर विनंती शासन निर्णयास अनुसरुन नसल्याने ती वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. त्यास वित्त विभागाने स्पष्टपणे मान्यता दिलेली नाही. त्याचप्रमाणे, सिकॉमने २% दंडनीय व्याजही दिलेले नाही.

**११.२** महानगर आयुक्त यांनी सांगितले की, वित्त विभागाच्या सदर पत्रामध्ये प्राधिकरणाने सिकॉमकडे ३ वर्षांपर्यंत ठेवी ठेवाव्यात, असा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नाही. तसेच प्रस्तावास स्पष्टपणे मान्यता दिलेली नाही. व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी असे सांगितले की, वित्त विभागाच्या पत्रावरुन असे दिसते की, प्राधिकरणाने पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सिकॉमला प्राधिकरणाच्या ठेवी परत करण्याबाबत जे वेळापत्रक दिलेले आहे, त्याची अंमलबजावणी कटाक्षाने करण्यात यावी. जर सिकॉमने वेळापत्रकाप्रमाणे ठेवी दिल्या नाहीत तर त्यांच्यावर २% अतिरिक्त व्याज आकारण्यात यावे व तसे सिकॉमला कळविण्यात यावे. सदर प्रस्तावास कार्यकारी समितीने सहमती दर्शविली.

**बाब क्र.१२ : पायाभूत / मुलभूत सुविधांची कामे करणा-या सार्वजनिक उपक्रमांकडे प्राधिकरणाच्या असलेल्या ठेवीचे धोरण ठरविण्याबाबत.**

**१२.१** मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी बाब टिप्पणीबाबत माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २००३ रोजी झालेल्या

बैठकीमध्ये कार्यकारी समितीने असे निदेश दिले होते की, पायाभूत / मुलभूत सुविधांची कामे करणा-या सार्वजनिक उपक्रम / तत्सम संस्थामधील ठेवींवरील व्याजाच्या दरात सवलत देण्यात यावी किंवा कसे, हया संस्थांनी अदा केलेली रक्कम मुद्दलापोटी / कर्ज / ठेवीपोटी जमा करण्यात यावी किंवा कसे, तसेच हया संस्थांना दंडनीय / विलंब आकार आकारण्यात यावा किंवा कसे आणि जर हया संस्थांना सवलत दिल्यास प्राधिकरणास किती आर्थिक नुकसान होईल याची तपासणी करुन सविस्तर प्रस्ताव कार्यकारी समितीकडे सादर करावा. कार्यकारी समितीच्या निदेशानुसार सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या ठेवींच्याबाबत धोरण काय असावे याबाबत बाब टिप्पणीत संक्षिप्तपणे माहिती दिली आहे. मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी असे सांगितले की, व्याज प्रलंबित असताना संबंधित संस्थांनी अदा केलेली रक्कम वित्तीय संस्थांमध्येही प्रथम मुद्दलापोटी / कर्जापोटी समायोजित करण्यात येत नाही तसेच रक्कम वेळेवर अदा न केल्यास त्यावर दंडनीय व्याज / विलंब आकार वित्तीय संस्थांमध्येही आकारण्यात येतो. सिडकोने अदा केलेली रक्कम मुद्दलापोटी / कर्जापोटी समायोजित केल्यास इतर संस्थांना त्याचा लाभ द्यावा लागेल व हे प्रचलित पध्दतीला अनुसरुन नसल्यामुळे अदा केलेली रक्कम प्रथम व्याजापोटी समायोजित करणे जास्त संयुक्तिक आहे.

१२.२ व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी असे सुचविले की, मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत / मुलभूत सुविधांचे काम करणा-या संस्थांना व्याजाच्या दरामध्ये सवलत देण्यात यावी व त्यांनी अदा केलेली रक्कम मुद्दलापोटी जमा करावी कारण या संस्था प्राधिकरणाच्यावतीने पायाभूत / मुलभूत सुविधांची कामे करीत असतात. प्राधिकरणाने त्या संस्थांना निधी देताना नफ्याचा उद्देश ठेऊ नये. त्याचप्रमाणे, ज्या संस्थांनी प्राधिकरणाच्या ठेवी / कर्जे वेळेवर परत केलेली आहेत, त्यांचा विचार करुन प्राधिकरणाने कर्जावर / ठेवीवर व्याज आकारताना सहानुभूतीपूर्वक धोरण अवलंबवावे. सिडकोने प्राधिकरणास परत केलेली रक्कम प्रथम मुद्दलापोटी समायोजित करण्यात यावीत तसेच व्याजाच्या दरातही सवलत द्यावी.

१२.३ यासंबंधात महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सिडकोने प्राधिकरणाची ठेव वेळापत्रकाप्रमाणे परत केलेली नाही, तरीही सिडकोने मोठया प्रमाणावर प्राधिकरणाची रक्कम परत केलेली असल्याने तसेच सिडको मुंबई महानगर प्रदेशामध्ये पायाभूत / मुलभूत सुविधांची कामे करीत

असल्याने प्राधिकरणाने ठेवींबाबत सहानुभूतीपूर्वक विचार केला आहे. प्राधिकरणाने यापूर्वी ज्या कमाल व्याजाच्या दराने वित्तीय संस्था / बँकांमध्ये निधीची गुंतवणूक केलेली आहे, त्या दरापेक्षा १% अधिक व्याज सिडकोने प्राधिकरणास अदा करावे. परंतु सिडकोने यापूर्वी अदा केलेली रक्कम मुद्दलापोटी / कर्जापोटी समायोजित करणे तत्वतः योग्य नाही. प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी महानगर आयुक्त यांच्या प्रस्तावास संमती दर्शविली. त्यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरण ज्या पध्दतीने इतर संस्थांकडून मिळालेल्या निधीचे समायोजन ठेवी / व्याजापोटी करते त्या पध्दतीने सिडकोने अदा केलेली रक्कम समायोजित करण्यात यावी. व्याजाच्या दरात आणखी काही सूट देणे आवश्यक असल्याने त्याचा विचार कार्यकारी समितीने करावा.

१२.४ प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, सिडकोने प्राधिकरणाच्या ठेवींची रक्कम मोठया प्रमाणात परत केलेली असल्याने दंडनीय व्याज / विलंब आकार आकारण्यात येऊ नये. तसेच प्राधिकरणास वेळोवेळी ठेवींवर जो व्याजाचा दर वित्तीय संस्था / व्यापारी बँका / राष्ट्रीयकृत बँकांकडून मिळालेला असेल, त्यांचा सरासरी व्याज दर सिडकोला दिलेल्या ठेवींवर लावण्यात यावा. महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरणाचा निधी वेळेवर मिळण्याकरीता विलंब आकार आकारणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावास कार्यकारी समितीने मंजूरी दिली तसेच ठेवीच्या धोरणास पुढीलप्रमाणे मंजूरी दिली.

<u>ठराव क्र.९१३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** सिडकोने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ठेवींची रक्कम मोठया प्रमाणात परत केलेली असल्यामुळे, वित्तीय संस्था / व्यापारी बँका / राष्ट्रीयकृत बँका यांच्याकडून ज्या कमाल सरासरी दराने व्याज मिळालेले आहे तो व्याजाचा दर प्राधिकरणाच्या सिडकोकडील ठेवींवर मे, १९९८ पासून आकारण्यात यावा. दंडनीय व्याज / विलंब आकार आकारण्यात येऊ नये. तसेच सिडकोने / इतर तत्सम संस्थांनी अदा केलेली रक्कम प्रथम प्रलंबित व्याजापोटी समायोजित करण्यात यावी.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेशामध्ये ज्या संस्था / उपक्रम पायाभूत / मुलभूत सुविधांची कामे करतात, त्यांच्याकडील ठेवींबाबत पुढील धोरण अवलंबिण्यात यावे :-

(१) प्राधिकरणाच्या अधिनियमामध्ये कर्जे व गुंतवणूक यामध्ये फरक केला आहे व संबंधित तरतूदी वेगवेगळया कलमाखाली दर्शविल्या आहेत, त्यामुळे गुंतवणूक व कर्जे याबाबत स्वतंत्र धोरण असणे आवश्यक आहे.

(२) गुंतवणूक करताना वित्तीय शिस्तीचे पालन करुन व शासन धोरणानुसार निधी गुंतविणे आवश्यक आहे. सर्व वित्तीय संस्थेत व बँकेमध्ये अदा केलेल्या रक्कमेचे प्रथम व्याजापोटी समायोजन करण्यात येते. आर्थिक शिस्तीचा विचार करता सार्वजनिक संस्थांनी शासनाने रक्कम प्रथम व्याजापोटी वळती करण्यात यावी, ठेवीपोटी समायोजित करण्यात येऊ नये.

(३) शासन निर्णयानुसार प्राधिकरण सार्वजनिक उपक्रमांकडे ठेव रक्कम फक्त एका वर्षासाठी गुंतवू शकते. सार्वजनिक उपक्रमाने प्राधिकरणास ठेवींची रक्कम वेळेवर न दिल्यामुळे प्राधिकरणाच्या / कार्यकारी समितीच्या निर्णयाप्रमाणे वाढीव कालावधीकरीता २% दंडनीय व्याज यापुढे आकारण्यात यावे.

(४) निधी बाजारातील व्याज दरातील घसरण लक्षात घेऊन, सार्वजनिक उपक्रमातील संस्थांना व्याजाचा दर वित्तीय संस्था / बँका यांच्या ठेवीच्या ३६६ दिवसांसाठीच्या कमाल प्रचलित दरापेक्षा १% जास्त आकारण्यात यावा.

(५) जर काही संस्था प्राधिकरणाची ठेव ठराविक वेळी / मुदतीत परत करणार असतील तर विशिष्ट संस्थेचा विचार करण्यात यावा. याबाबत वरील धोरणास अनुसरुन सदर संस्थेस दंडनीय व्याज / विलंब आकार आकारण्यात यावे किंवा नाही याचा निर्णय घेण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(६) वरील धोरण विचारात घेवून सार्वजनिक उपक्रमाकडील ठेवीची / प्रलंबित व्याजाची परतफेड लवकर मिळविण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील धोरणाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे सर्व अधिकार प्रदान करण्यात येत आहेत."

**बाब क्र.१३ : प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ जानेवारी, २००४ ते दिनांक ३० एप्रिल, २००४**

प्राधिकरणाकडील दिनांक १ जानेवारी, २००४ ते दिनांक ३० एप्रिल, २००४ पर्यंतच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१४ : अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी पथक स्थापन करणे.**

**१४.१** या प्रस्तावासंबंधात प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले की, अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास केंद्रवर्ती संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने नामनिर्देशित केले आहे. तसेच या प्रकल्पाच्या प्रस्तावित अंमलबजावणीच्या धोरणास २०४ व्या बैठकीत कार्यकारी समितीने तत्वतः मान्यता देऊन प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे. या धोरणामध्ये असे प्रस्तावित केले आहे की, प्राधिकरणामध्ये एक प्रकल्प अंमलबजावणी पथक स्थापन करावे. हे पथक तातडीने स्थापन करणे आवश्यक असल्यामुळे पथकाची निर्मिती करण्यासाठी प्राधिकरणाच्या अध्यक्षांची मान्यता घेण्यात आली आहे. प्रकल्प अधिकारी हे या पथकाचे प्रमुख असतील. या पदावर श्री.मदान, भारतीय रेल्वेचे सेवानिवृत्त महाव्यवस्थापक यांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. श्री.मदान यांना सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेचा ४५ वर्षाचा अनुभव असून त्यांनी अनेक प्रकल्प हाताळलेले आहेत.

**१४.२** सदर प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९१४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (एक) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन अंधेरी-घाटकोपर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेच्या अंमलवजावणीसाठी स्थापन करावयाच्या प्रकल्प अंमलबजावणी पथकामध्ये प्रकल्प अधिकारी म्हणून

श्री.जी.आर.मदान यांची सुरुवातीस १ वर्षाच्या करार तत्वावर, कार्यालयीन वाहन, निवासी टेलिफोन किंवा मोबाईल व इतर भत्ते आणि रु.३५,०००/- च्या मासिक वेतनावर नेमणूक करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्प अंमलबजावणी पथकामध्ये करार तत्वावर / प्रतिनियुक्तीवर तांत्रिक व सहाय्यकारी कर्मचारी यांची नेमणूक करण्यासाठी शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : एकत्रित तिमाही व्यवस्थापन अहवाल - दिनांक ३० सप्टेंबर, २००३ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००३ अखेरचा.**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी - दिनांक ३० सप्टेंबर, २००३ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००३ अखेरच्या तिमाही अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**पटल बाब क्र.१ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) - एम.आय.डी.सी. आणि विमानतळ परिसरातील रस्त्यांच्या कामांची अंमलबजावणी ASIDE योजनेअंतर्गत करणे.**
**– अहवाल तयार करण्याकरीता व भारत सरकारकडे अर्ज सादर करुन त्याबाबत कार्यवाही करण्याकरीता सल्लागारांची नेमणूक करणे.**

या बाब टिप्पणीची पार्श्वभूमी विशद करताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सिप्झ, एमआयडीसी आणि विमानतळाच्या परिसरातील १२ रस्त्यांच्या पायाभूत सुविधांची कामे केंद्र शासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने तयार केलेल्या ASIDE (Assistance to State for Developing Export Infrastructure and Allied Activities) योजनेअंतर्गत हाती घ्यावयाची आहेत. ASIDE योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामांसाठी ५०% निधी भारत सरकार व उर्वरित ५०% निधी महाराष्ट्र शासन उपलब्ध करुन देईल. या योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या रस्त्यांच्या कामांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तसेच केंद्र शासनाकडे विहीत नमुन्यात अर्ज करण्यासाठी आणि संबंधित

विभागाकडे पाठपुरावा करण्याकरीता रु.६.४८ लाख (सेवाकरासहित) या एकूण खर्चासह MITCON या सल्लागार संस्थेची एक स्त्रोत तत्वावर नेमणूक केली असून या नेमणूकीस कार्यकारी समितीची कार्योत्तर मंजूरी घेण्यासाठी बाब टिप्पणी सादर केली आहे.

सदर प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९१५ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम ३ चे पोटकलम (तीन) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन ASIDE योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या रस्त्यांच्या कामांचा प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तसेच भारत सरकारकडे विहित नमुन्यात अर्ज करण्यासाठी आणि संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याकरीता रु.६.४८ लाख (८% सेवाकरासह) या एकूण खर्चासह MITCON या सल्लागार संस्थेची एक स्त्रोत तत्वावर नेमणूक करण्याकरीता कार्यकारी समिती याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** ASIDE योजनेअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी समिती महानगर आयुक्तांना याद्वारे अधिकार प्रदान करीत आहे."

**पटल बाब क्र.२ : अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद परिवहन यंत्रणेची (MRTS / LRTS) अंमलबजावणी – मालकाच्या सल्लागाराची नेमणूक करणे.**

या बाब टिप्पणी संदर्भात प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले की, अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद परिवहन यंत्रणेच्या अंमलबजावणीसंदर्भात महत्वाच्या बाबींना २०५ व्या बैठकीत कार्यकारी समितीने तत्वतः मान्यता देऊन प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी

शिफारस केली आहे. त्यामध्ये, निविदा तयार करणे, खाजगी क्षेत्रातील संस्था निवडणे (Selection of Concessionaire) व प्रकल्पाच्या प्रारंभाच्या कामांपासून प्रकल्पाच्या अंमलबजावणीपर्यंतच्या सर्व कामांसाठी मालकाच्या सल्लागाराची (Owner's Consultant) नेमणूक करण्यासाठी जागतिक स्तरावर निविदा मागविण्यास कार्यकारी समितीने तत्वतः मान्यता दिली आहे. मालकाच्या सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी विचारार्थ विषय (TORs) व इतर संबंधित कागदपत्रे तयार करण्यात येत आहेत. यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असून या समितीने ७ सल्लागारांची संक्षिप्त यादी तयार केली आहे. मालकाच्या सल्लागाराची नेमणूक करण्यासंबंधात, या संक्षिप्त यादीतील सल्लागारांकडून प्रस्ताव मागविण्यास कार्यकारी समितीने मान्यता द्यावी.

सदर बाब टिप्पणीवर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९१६</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) आणि त्याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पटल बाब टिप्पणीतील परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या सल्लागारांच्या खालील संक्षिप्त यादीस मंजूरी देत आहे :-

(१) मे.राईट्स लि. इंडिया

(२) मे.पेसीफिक कन्सल्टंट्स, जपान

(३) मे.डी.ई.कन्सल्टंट, जर्मनी

(४) मे.केएलआरटी कन्सल्टंन्सी अँड इंजिनियरींग सर्व्हिसेस, मलेशिया

(५) मे.लुईस बर्जर असोसिएट्स, अमेरीका

(६) मे.एसएमआरटी कॉर्पोरेशन लि., सिंगापूर

(७) मे.सोविल (SOWIL) लि., भारत

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मालकाच्या सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी विचारार्थ विषयांना (TORs) अंतिम स्वरुप देणे, निविदा मागविणे, निविदांचे मूल्यमापन करणे व वाटाघाटी करणे यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. मालकाच्या सल्लागाराच्या नेमणूकीचा अंतिम प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— oooooooooo ——

**जोडपत्र-१**

## मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्ते विकास कामांच्या मंजूर केलेल्या निविदा

| अनु. क्र. | निविदेतील कामाचा क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रु.) | निविदाकाराचे नांव | निविदेची रक्कम (रु.) | टक्केवारी | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १. | मुख्य जोड रस्ता एल टी रोड ते जांगळेकर नाला | २३६८२४८८७.०० | मे.रीलायन्स मिर्शागन (जे.व्ही) | २११२४७७९९.२० | -१०.८ | लघुत्तम |
| २. | ३. | स्वामी विवेकानंद रोड मिलन सबवे सांताक्रुझ ते वांद्रा व मुख्य जोड रस्ता सांताक्रुझ बस आगार ते वांद्रा | १४७४०७०३४.०० | मे. आर.पी.शाह | १३९८४५०५३.१६ | -५.१३ | लघुत्तम |
| ३. | ६. | गोरेगांव मुलुंड जोडरस्ता, मुख्य जोड रस्ता ते पश्चिम द्रुतगती महामार्ग | १०३१९१६२९.०० | मे. जे.पी. एन्टरप्रायझेस | ९६६९०५५६.३७ | -६.३ | लघुत्तम |
| ४. | ५. | अंधेरी घाटकोपर जोडरस्ता, वर्सोवा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग | १६२७६८८६३.०० | मे. आर.के. मधानी-प्राइम (जे.व्ही.) | १५९८३९०२३.४७ | -१.८ | लघुत्तम |
| ५. | ७. | अंधेरी घाटकोपर जोडरस्ता, साकीनाका ते पुर्व द्रुतगती महामार्ग (असल्फा मिसींग लींक) | ३११९८९०५१.०० | मे. पेटॉन-प्रतिभा (जे.व्ही) | २९९५०९४८८.९६ | -४.० | लघुत्तम |
| ६. | ८. | पश्चिम द्रुतगती महामार्ग, आरे उड्डाण पुल (उत्तरेकडील) ते टाईम्स ऑफ इंडीया (उत्तरेकडील) | २६८८०१५६१.०० | मे.के.बी.ब्रहमपुत्रा कॉन्सोर्टिअम | २६२७५३५२५.८८ | -२.२५ | लघुत्तम |
| ७. | ९. | पश्चिम द्रुतगती महामार्ग आशानगर सबवे ते कुलुपवाडी पादचारी सबवे | २८०६५७७३६.७५ | मे. अटलांटा इनफ्रास्ट्रक्चर लि. | २७५८५८४८९.४५ | -१.७१ | लघुत्तम |
| ८. | १०. | पश्चिम द्रुतगती महामार्ग, एस एन दुबे रोड जंक्शन ते गोवर नाला (दहिसर) | २६४३८७०२५.०० | मे. टारमेट प्राईम (जे.व्ही.) | २५४८६९०९२.१० | -३.६ | लघुत्तम |
| ९. | ११. | पूर्व द्रुतगती महामार्ग, सायन उड्डाण पुल ते घाटकोपर | ३१८०९८५२१.०० | मे. अजवानी - अर्श्वानी (जे.व्ही.) | ३०५५०१८१९.५७ | -३.९६ | लघुत्तम |
| | | एकूण | २०९४,१२६,३०७.७५ | | २००६,११४,८४८.१६ | | |